# प्रकरण - ६

# परीक्षण

SHIVAJI UNIVERSITY
KOLHAPUR

## प्रकरण - ६

# परीक्षण

अलिकडच्या काळात इतिहास संशोधनात स्थानिक इतिहासाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. त्यात स्थानिक परिस्थिती आणि ती परिस्थिती बदलण्यासाठी स्थानिक लोकांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय ठरतात. याद्दष्टिने पश्चिम महाराष्ट्रातील सातारा शहराचा स्थानिक इतिहासाला महत्व प्राप्त झाले आहे. वेगवेगळया कालखंडात या शहराच्या इतिहासाची नोंद घेतली आहे. त्यात सन १९०० ते १९४७ या कालखंडात या शहरात झालेले बदल विशेष लक्षणीय ठरतात. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, साहित्यिक इ. विविध क्षेत्रात जो बदल झाला त्यामुळे शहराच्या इतिहासात महत्वाचे बदल झाले. समाजसुधारक व विचारवंतांमुळे या शहराचे जुने, परंपरागत स्वरूप बदलून त्याठिकाणी नवीन कल्पना, नवीन विचार रूजण्यास सुरूवात झाली. समाजात जागृती होऊन समाजाने रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, अंधविश्वास यातून बाहेर येण्याचा प्रयत्न केला. याद्दष्टिने सातारा हे एक लक्षवेधी शहर ठरते.

सातारा शहराच्या विशिष्ठ अशा भौगोलिक परिस्थितीमुळे येथील लोक कष्टाळू, कटक व चपळ आहेत. शहरातील लोकांच्या या गुणधर्मामुळेच शहरातील लोकांना स्वातंत्र्य चळवळीत कडवी झुंज दिली. त्यामुळेच स्वातंत्र्य चळवळीत महत्वाचा भाग पार पाडणारे म्हणून हे शहर प्रसिध्द आहे. २०व्या शतकात तर हे त्यागी कार्यकर्त्यांचे शहर म्हणून लक्षात राहते. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व स्वातंत्र्य वीर सावरकर यांचे निष्ठावंत अनुयायी साताऱ्यात होते. या अनुयायींनी स्वातंत्र्य चळवळीत महान कामगिरी बजावून सातारा शहरास एक वैशिष्टयपूर्ण स्थान प्राप्त करून दिले आहे. शहरातील लोकांनी प्रतिसरकारची स्थापना करून स्वातंत्र्य लढयात महत्वपूर्ण कामगिरी केली. शहरातील प्रतिसरकारचे कार्य अलौकिक होते. शहरातील प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत आत्मबलिदान दिल्याने शहरात नवे स्फुरण निर्माण झाले. प्रतिसरकारची

लढाई एवढी प्रभावशाली होती की, त्याची दखल इंग्रज सरकारलाही घ्यावी लागली. राजकीय क्षेत्रात झालेल्या प्रयत्नांमुळे स्वातंत्र्य प्राप्तीकडे वाटचाल होऊन १९४७ ला स्वातंत्र्य प्राप्ती झाली. त्यात सातारा शहराचा मोठा वाटा आहे. शहरातील लोकांच्या स्वातंत्र्याच्या प्रबळ महत्वकांक्षेमुळे स्वातंत्र्य लढयात शहराने महत्वपूर्ण स्थान मिळविले असे दिसते.

इ.स. १८९९ हे वर्ष सातारा शहराच्या शैक्षणिक विकासास चालना देणारे ठरले. यावर्षी डेक्कन एज्युकेशन सोसायटीने शहरात न्यु इंग्लिश स्कुलची स्थापना केली. या शाळेच्या स्थापनेपासून स्फुर्ती घेऊन शहरात इतर संस्थांनीही शाळा, कॉलेजच्या स्थापनेस सुरूवात केली. कोणत्याही शहराच्या भवितव्याच्या दृष्टिने तेथील जनता शिक्षित व सुजाण असणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. या जाणीवेतून २०व्या शतकाच्या पूर्वार्धात शहरात निरनिराळया शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या. शहरातील नगरपालिकांच्या शाळेनंतर सर्वप्रथम महाराणा प्रतापसिंह यांनी शहरातील समाजासाठी पहिले मराठी हायस्कुल सुरू केले. त्यानंतर न्यु इंग्लिश स्कुल, अनंत इंग्लिश स्कुल शहरात स्थापन करून शैक्षणिक विकासात भर टाकली. समाजातील स्त्रियांची परिस्थिती सुधारल्याशिवाय समाजाचा उध्दार होणार नाही हे ओळखुन महर्षि कर्वे यांनी पुणे शहरात महिला विद्यापीठाची स्थापना केली व या विद्यापीठांच्या धर्तीवरच सातारा येथे महर्षि कर्वे स्त्री शिक्षण कन्या शाळा सुरू केली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून स्फुर्ति घेऊन रयत शिक्षण संस्था स्थापन केली व शहरात सर्व धर्मियांसाठी शाळा व कॉलेजची स्थापना केली. राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर येथे सर्व जातीच्या समाजासाठी वेगवेगळी वसतिगृहे स्थापन केली होती. परंतू कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शहरात सर्वच जातीच्या मुलांसाठी एकच वसतिगृह स्थापन करून सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली. बहुजन समाजाचे, दैन्य, दारिद्रय, अंधश्रध्दा, अज्ञान यांचे मूळ शिक्षणाच्या अभावामध्ये आहे हे ओळखून बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी शहरातील शैक्षणिक संस्थानी प्रयत्न केले. शहरात कन्या शाळेची स्थापना करून शहरातील स्त्री शिक्षणास चालना दिली गेली. शहरातील शैक्षणिक संस्थानी शिक्षणाचे महत्त्व समाजातील सर्व

स्तरांपर्यंत पोहचविले व शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. शहराने शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करून छत्रपती शिवाजी कॉलेज हे पहिले ग्रामीण विद्यालय शहरात निर्माण केले. पुणे, मुंबई, कोल्हापूर या शहरांच्या तुलनेने सातारा शहराचा शैक्षणिक विकास कमी झाला असला तरी येथील शैक्षणिक प्रगतीमुळे पुढील काळात शहरात रयत शिक्षण संस्थेची स्थापना होण्यास चालना मिळाली. शैक्षणिक क्षेत्रात सुधारकांनी व संस्थांनी केलेल्या कार्यामुळेच आज सातारा शहर हे शाळा व महाविदयालयांनी फुलून गेले आहे. शैक्षणिक व क्षेत्रातील प्रगती नेत्रदीपक ठरली आहे.

सातारा शहरातील समाज हा परंपरावादी असून या समाजावर धर्म, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, जातीसंस्था, यांचा जबरदस्त पगडा होता. २०व्या शतकाच्या पूर्वार्धात शहरातील अनेक समाज सुधारकांनी लोकांच्या पारंपारिक चालीरिती, सवयी, अंधश्रध्दा रूढी परंपरा दूर करून नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंपरावादी समाजाला धक्के देण्याचे काम समाजसुधारकांनी केले होते. समाजसुधारकांनी शहरातील दलित, अस्पृश्य वर्ग व स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठीही महत्वपूर्ण प्रयत्न केले. शहरात शैक्षणिक प्रगती झाल्यामुळे जुन्या, बुरसटलेल्या, अंधश्रध्देवर आधारित असलेल्या परंपरा नष्ट होऊ लागल्या व सामाजिक प्रगती घडवून आणण्यासाठी नेत्यांनी सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था याद्वारे प्रबोधन केले. या समाजसुधारकांनी सामाजिक, शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेबरोबरच गणेशोत्सव व शिवजयंती सारखे उत्सव साजरे करून उत्सवावेळी निघणाऱ्या मिरवणूका व मेळे यामधून समाज प्रबोधनाचे कार्य केले. त्यामुळे शहरातील सामाजिक परिस्थिती सुधारण्यास प्रोत्साहन मिळाले. महात्मा फुले, केशवराव विचारे, कर्मवीर भाऊराव पाटील इ. नेत्यांच्या आधारेच समाज जागृती घडून आली. अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी-परंपरा यांचे महत्व कमी झाले. शहरातील या सामाजिक पार्श्वभूमीवरच येणाऱ्या काळात नरेंद्र दाभोळकर यांनी साताऱ्यात अंधश्रध्दा निर्मलून समितीची स्थापना केली. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी ठिकठिकाणी प्रात्यक्षिके करून त्याबाबत जागृती घडवून आणली. त्यामुळे समाज सुधारणेच्या प्रक्रियेत मदत झाली.

वृत्तपत्रांना समाजाचा आरसा म्हणतात. कारण समाजातील घडामोडीचे

प्रतिबिंब त्यात दिसून येते. २०व्या शतकाच्या पूर्वार्धात शहरातील वृत्तपत्रांनीही सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात पुढाकार घेतला. लोकमान्य टिळक यांनी आपल्या केसरी या वृत्तपत्राच्या स्थापनेचा उद्देश केसरीच्या पहिल्या अंकात प्रकाशित केला होता. तो पुढीलप्रमाणे, "अंधाऱ्या रात्री नगरपालिकेचा दिवा ज्याप्रमाणे लोकांना मार्ग दाखवितो. त्याचप्रमाणे वृत्तपत्रेही समाजाला मार्ग दाखवतील." व त्याप्रमाणेच वृत्तपत्रांनी प्रस्थापित रूढी-परंपरा, अंधविश्वास याविरूध्द बंड करण्याची लोकांत मानसिक तयारी केली. शहरातील वृत्तपत्रांनी महत्वाची सामाजिक जागृती केली. सामाजिक कार्याबरोबरच शैक्षणिक जागृतीचे महान कार्यही वृत्तपत्रांनी केले. वृत्तपत्रांमुळे सामाजिक चळवळीस गती प्राप्त होऊन सामाजिक प्रगती होण्यास मदत झाली.

सातारा शहर हे विविध धर्मीयांचे शहर आहे. या शहरात निरनिराळया धर्माचे, पंथाचे लोक राहत. सातारा शहरात सर्व धर्मीयांची धार्मिक स्थानेही शहरात आढळतात. स्वातंत्र्यापूर्वी शहरातील निरनिराळया धर्मियांमध्ये एकता असल्याचे दिसते. सर्व धर्मीय लोक एकमेकांच्या सण व उत्सवांमध्ये सहभागी होत असत. शहरातील धार्मिक स्थळांच्या निर्मितीबाबत धर्माधर्मांमध्ये वाद किंवा अडचण निर्माण झाल्याचे आढळत नाही. स्वातंत्र्यापूर्वीच शहरातील सर्व धर्मिय समाजामध्ये एकता असल्याने स्वातंत्र्यानंतरही शहरात कधीही धार्मिक वाद निर्माण झाल्याचे आढळत नाही.

सातारा हे साहित्यिक घटकांचे केंद्र मानले जाते. सातारा शहराच्या साहित्यिक विकासास चालना ही प्रामुख्याने न्यु इंग्लिश स्कुलच्या स्थापनेपासून मिळाली. शहरातील शैक्षणिक संस्थांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून स्फुर्ति घेऊन शहराने साहित्यिक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केल्याचे दिसते. या शहराने अनेक लेखक, कवी, कादंबरीकार, साहित्यिक या समाजास दिले. साहित्यिक घटकांमध्ये लेखक, कादंबरीकार, कवी यांचा समावेश असून त्याचबरोबर नाटय व नाटककार, शाहिर, तमासगीर व गोंधळी यांनाही महत्व दिले जाते. शहरात साहित्यिक क्षेत्राकडे समाजाचा कल असून साहित्यिक क्षेत्रात प्रगती केल्याचे आढळते. साहित्याच्या क्षेत्रात परंपरागत कलांवर भर दिला गेला असला तरी साहित्यातील इतर घटकांवरील लक्ष केंद्रित करून साहित्यात मोलाची भर टाकली.

शहराने सांस्कृतिक बदलाचे स्वागत करून त्यात आवड निर्माण करून साहित्यिक क्षेत्रात प्रगती केली. शहरातील सांस्कृतिक परिस्थितीचा परिपाक म्हणजे शाहू कला मंदिराची निर्मिती होय. शाहू कला मंदिर येथे अनेक कलापथके, नाटय प्रयोग होतात. शहराच्या सांस्कृतिक प्रगतीमुळे तेथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. निरनिराळया साहित्यिक संस्था येथे साहित्यिक घटना व विचार संमेलने घडवून आणतात. शहराच्या सांस्कृतिक घटकातील क्रीडाक्षेत्रातील प्रगतीमुळे आजतागायत छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे निरनिराळया खेळांच्या स्पर्धा भरविल्या जातात. या स्पर्धांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील खेळाडू सहभागी होतात. त्याचबरोबर येथे कर्मवीर वक्तृत्व स्पर्धाही घेतल्या जातात. समाजात अनेक साहित्यिक, कलावंत, कवी यांना आपल्या कला दाखविण्याचा चांगला वाव मिळाल्याने शहरात नेहमीच साहित्यिक चर्चा, संमेलन, संगीताच्या मैफली, रंगभूमीवरील प्रयोग हे नियमित होऊन सांस्कृतिक प्रगती निश्चितच झाल्याचे दिसते. त्याचबरोबर लोकांनी ग्रामीण साहित्य तमाशा, गोंधळ यांचीही योग्य रित्या जपणूक करून ते कायम ठेवले आहे.

वरील सर्व सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीमुळे सातारा शहराचे मध्ययुगीन स्वरूप जाऊन त्यास आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. सातारा शहर हे स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य भावनेने प्रेरित झाले असल्यामुळे शहरातील समाजाचे लक्ष हे सामाजिक व सांस्कृतिक प्रगती करण्यापेक्षा स्वातंत्र्य प्राप्तीकडे जास्त होते. तरीही शहराने स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. सातारा शहर हे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अल्पावधीत प्रगती करणारे शहर म्हणून ओळखले जाते.

०-०-०-०